Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldgrt.lbp.world**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016

Golden Research Thoughts



GRT

# ''सहकारी चळवळीचे संघटन आणि व्यवस्थापन व नविन आर्थिक धोरणाचा अभ्यास''

श्री. आदमाने सिद्धर्थ विश्वनाथ[1] , प्रा. डॉ. साळवे जे. एम[2]
[1]टी. वाय. बी. कॉम , मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.
[2]मार्गदर्शक

*प्रस्तावना : –*

सहकार्य ही एक सहज आणि नैसर्गीक मानवी प्रवृत्ती असली तरी सहकार ही तशी मानवी विचारधारा नाही. कारण सहकार्याच्या प्रवृत्तीत तिची परतफेड होण्याची स्वार्थाची प्रेरणा व्यक्तिला कार्यप्रवृत करीत असते. सहकाराच्या संकल्पनेत व्यक्तीला स्वार्थाच्या प्रेरणेला मर्यादित करावे लागते.

शहकार ही संकल्पना सहकारी संस्थेच्या स्थापनेपेक्षा आणि सुचारू प्रशासनापेक्षा तसेच कार्य क्षम व्यवस्थानापेक्षा जास्त व्यापक आणि गहरी संकल्पना आहे. सहकारी संस्था सहकाराच्या संकल्पनेचा एक अविभाज्य भाग आहेत. पण सहकार म्हणजे सहकारी संस्था नव्हते. शहकार ही संकल्पना ही चळवळ सर्वप्रकारच्या राजकीय. सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेस पोषक आहे. तसेच विविध प्रकारच्या समाजव्यवस्था साध्य करू पाहत असलेली उद्धिष्टे प्राप्त करण्याठी सहाय्यभूत ठरलेली आहे. शुद्ध भांडवलशाही तसेच शुद्ध साम्य व्यवस्था या दोन टोकांच्या समाजव्यवस्थांच्या विविध मिश्र व्यवस्थांमध्ये ती सारख्याच कार्यक्षमतेने कार्य करीत असते.

स्हकारी व्यवस्थेची तत्व प्रणाली मजबुत पायावर आधारलेली आहे. असे असले तरी सहकार व्यवस्थेची सतत उत्क्रांती होत असते. सहकार व्यवस्था खुप लवचिक असुन तिच्यात नवीन विचार प्रवाह सामाहून घेण्याची क्षमता आहे. सहकारामध्ये सर्वजन तारतम्याने वागतील अशीच या अर्थव्यवस्थेची चौकट आहे. उत्पादन साधनांच्या मालकीतून निर्मान होणारा वाढावा. खंड वास्तविक पाहता समाजाची मत्ता आहे. या विचारातून मत्तेदारी उत्पन्नाच्या सामाजीक– करणाच्या संकल्पनेचा विकास झाला.




शेतजमिन उध्योग समाजाच्या मालकीचे असावेत. सार्वजनिक मालकीचे नच्होत. मक्तेदारी असुच नये. असतिलच तर ती समाजाची असावी. भांडवली अथवा साम्यवादी व्यवस्थेत निर्माण होणार या समस्यांचे निराकरण नैसर्गीक साधन संपत्तीचे आणि उध्योगांचे सामाजिककरण करणे हा एकमेव रास्त परियाय आहे. असे केल्यामुळे काम करण्याची प्रेरणा नष्ट होते हा अक्षेप नसून सबब आहे.

सुयोग्य व्यवस्थापन आणि प्रशासन यांच्या अम्मल बजावणी मधून ही प्रेरणा निर्माण करता येते. आणि भांडवलशाही खाजगी व्यवस्थेपेक्षा हि प्रेरणा जास्त प्रभावी आणि शासवत असते.

अंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या 1995 मध्ये झालेल्या अधिवेशनात सहकाराच्या व्याख्येत एक लहान परंतु महत्वाचा बदल करण्यात आला. आपल्या आर्थिक आणि सामाजिक गरजांच्या तसेच आकांक्षांच्या पुरतेसाठी सर्वानी स्वेच्छेने एकत्र येऊन सामायीक मालकी असलेली व लोकशाही पद्धतीने नियंत्रीत करता येईल अशा पद्धतीने स्थापना केलेली स्वायत संघटणा म्हणजे सहकारी संस्था होय. सहकारी व्यवस्था मुल्याधारीत व्यवस्था आहे. स्वहित कमालनफा संपत्ती व साधनांचे मक्तेदारीकरण यांसारख्या सकुंचीत आणि अशाश्वत अशा निसरडया तत्वांवर आधारलेली नाही. स्वमदत स्वताच्या जबाबदारीची जानिव लोकशाही तत्वांचा आदर, समता, समानता, एकता या सारख्या सामाजिक मुल्यांवर तसेच सचोटी. नियमांच्या पालन करण्याची वृत्ती. कायदा व ज्ञाय याबदद्ल आदर. विचारातील व वर्तनातील खुलेपणा. दुसऱ्यांच्या बदद्ल काळजी घेण्याची व दुसऱ्यांच्या मतांचा आदर करण्याची प्रवृत्ती या सारख्या नैतीक व्यक्तीगत मुल्यांवरती आधारलेले आहे. अर्थात या मुल्यांचे अग्रक्रम कालमानानुसार बदलत गेलेले दिसतात.

***सहकाराची मुलतत्वे :***

सहकाराची रॉशडेल मुलतत्वे आणि अंतर राष्ट्रीय सहकारी संघाने 1995 च्या आधिवेश्झनात स्विकारलेली सहकाराची मुलतत्वे यामध्ये काही प्रमाणात मुलभुत आणि प्रमाणात तपशिलात फरक आहे. यातून सहकाराची बदलत्या काळातील नवे विचार प्रवाह सामावून घेण्याचे आणि सहकाराच्या मुलतत्वांवरील लवचिकता दिसून येते.

***सहकाराची रॉशडेल मूलतत्वे:***

***1.खुले व ऐच्छीक सभासत्व :*** सहकारी संस्थांचे सभासदत्व ऐच्छीक असावे. कोणालाही सामाजीक राजकीय वंशीक अशा कृत्रीम आधारावर भेदभाव न करता सभासदत्व उपलब्ध असावे.

सहकारी संस्थानी समाजात कृत्रीम भेदभावातून निर्माण झालेला पुर्वग्रह दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विद्यार्थ्यानाही सहकारी संस्थांचे सभासदत्व खुल्ले असले पाहिजे.

***2. लोकशाही नियंत्रण :*** सहकारी संस्था लोकशाहीवादी असतात. सभासदांनी मान्य केलेल्या पद्धतीने नेमलेल्या अथवा निवडून आलेल्या लोकांनी सहकारी संस्थेंचे प्रशासन चालवले पाहिजे. सभासदांना मतदानांचा आणि सहकारी संस्थेशी संबंधीत निर्णयात सहभागी होण्याचा समान हक्क उपभोगता आला पाहिजे. सहकारी संस्थेचे व्यवहार परिणामकारक रितीने पार पाडण्यात सर्व सभासदांनी सहकार्य दिले पाहिजे.

***3. भागभांडवलावर मर्यादीत परतावा :*** भागभांडवलावर सभासदांना मिळणारा परतावा मर्यादीत असला पाहिजे. याचा अर्थ असा की सहकारी संस्थेने लोकांपेक्षा नफ्याला जास्त महत्व देऊन प्राधान्य देऊन सट्टेबाजी करण्यासाठी गुंतवणूक करू नये. सहकारी संस्थेची गुंतवणूक सर्वाच्या हितासाठी भल्यासाठी असते.

***4. सहकारी संस्थेच्या*** कार्यातून निर्माण होणारा वाढावा संस्थेच्या व्यवहारात सहभागी होणाऱ्यांचा असतोः सहकारी संस्थेच्या कार्यातून निर्माण होणारा निव्वळ वाछावा त्या संस्थेच्या कार्यात सहभागी होणाऱ्या सभासदांच्या मालकीचा असतो. त्याचे वाटप समान पध्दतीने झाले पाहिजे. हे तिने प्रकारांनी करता येते.

अ. सहकारी संस्थेच्या विकासासाठी निधी बाजुला काढून ठेवणे

ब. सभासदांना सेवा पुरविण्यासाठी त्याचा विनीयोग करणे आणि

क. सभासदांनी सहकारी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात त्याचे वाटप करणे.

***5. सहकारांचे शिक्षण :*** शर्व सहकारी संस्थांनी आपले सभासद. अधिकारी सेवक आणि जनता यांना सहकाराच्या आर्थिक तसेच लोकशाहीवादी तत्वांचे आणि तंत्रांचे शिक्षण दिले पाहिजे. सभासदांना सहकारी संस्थांच्या योगदानाची जान झाली पाहिजे. सहकारी संस्था कशा कार्य करतात याची माहिती असलेले लोक सहकारी संस्थांच्या व्यवहारांचे नियमण करण्यात जास्त प्रत्ययकारी भुमिका बजाऊ शकतात.

***6. सहकारी संस्थांचा सहकार :*** आपल्या सभासदांचे आणि समाजाचे हित जास्त चांगल्या प्रकारे जपण्यासाठी सहकारी संस्थांनी स्थानिक, राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांबरोबर शक्य असलेल्या सर्व प्रकारांनी सहकार्य केले पाहिजे.

अंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या शताब्दी सोहळयाच्या निमीत्ताने मॅचेस्टर येथे 1995 मध्ये भरलेल्या परिषदेत विसाव्या शतकाच्या अखेरीस निर्माण होणारी परिस्थीची विचारात घेऊन सहकारी चळवळींची भुमिका स्पष्ट करणारी तत्वे पुन्हा मांडण्यात आली. ती तत्वे अशी....

***1. एच्छीक व खुल्ले सभासदत्व :*** सहकारी संस्थेच्या सेवांचा लाभ घेऊ शकनारया व सभासदत्वातून निर्माण होणाऱ्या स्विकारनाऱ्या सर्वाना सामाजिक, वांशीक, राजकीय, धार्मिक अथवा लिंग भेद न करता सहकारी संस्थेचे सभासदत्व खुल्ले असावे. सहकारी संस्थांचे सभासदत्व एच्छीक आहे.

***2. सभासदांचे संस्थेवरील लोकशाही नियंत्रन :*** सहकारी संस्थेचे धोरण ठरविण्यात आणि निर्णय प्रक्रिया निच्छीत करण्यात सक्रिय सहभाग घेणाऱ्या सभासदांचे सहकारी संस्थेवर नियंत्रण असते.

***3. सभासदांचा आर्थिक सहभाग :*** आर्थिक संस्थेमध्ये सभासद समानपणे भांडवल गुंतवितात व त्यावर त्यांचे लोकशाही पद्धतीचे नियंत्रण असते. या भांडवलापैकी काही भाग तरी सर्वसाधारणपणे सामाजिक मत्ता असते.

***4. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य :*** सहकारी संस्था सभासदांच्या नियंत्रणाखाली कार्य करणाऱ्या स्वायत्त व स्व मदविवर उभ्या राहणाऱ्या संस्था आहेत. शासन अथवा इतर कोणत्याही संस्थेशी सहकारी संस्थेने करार करताना अथवा बाहेरून भांडवल उभे करताना सभासदांचे लोकशाही नियंत्रण आणि सहकारी संस्थेची स्वायत्तता अबाधीत राखली जाईल याची दक्षता घेतली पाहिजे.

***5. शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती :*** सहकारी संस्थेने आपले सभासद. निवडून आलेले प्रतिनिधी. व्यावस्थापक आणि सेवक यांना शिक्षण व प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यायोगे सहकारी संस्थेच्या विकासात ते परिणामकारकपणे सहभाग घेऊ शकतील.

***6. सहकारी संस्थामधील सहकार :*** सहकारी संस्थांनी सभासदांना उत्तम सेवा पुरवली पाहिजे. स्थानिक, राष्ट्रीय, विभागीय तसेच अंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्थांबरोबर सहकार्य करून त्यांनी सहकारी चळवळ सक्षम व बलवान केली पाहिजे.

***7. समाबदद्लचे कर्तव्य :*** सभासदानी मान्य केलेल्या धोरनात्मक उपयातून सहकारी संस्था आपल्या समाजाच्या कायमस्वरूपी विकासासाठी कार्य करतात. सहकारी संस्थेने मिळवलेल्या वाढाव्याचे वाटप करणाऱ्या संघाची पद्धत जास्त शास्त्रशुध वाटते.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने स्विकारलेल्या तत्वांमध्ये सहकारी संस्थांना सभासदाशिवाय इतरांकडून भांडवल घेण्याची मुबा देण्यात आाली आहे. तसेच इतर संस्थांबरोबर करार करून व्यवहार करण्याची मुबा ही दिली आहे. सहकार ही स्थिर संकल्पना नसून ती प्रवाही, सतत बदलनारी, समाजाभिमूख आहे हे विशेष होय.

***सहकार प्रणाली एक गतिशील व्यवस्था :***

सहकार संघटण पद्धती विकसी होत जाणारी प्रणाली आहे. स्वतः च्या हिताविषयी दक्ष्य असणारे लोक सहकारी संस्था स्थापन करतात. हे लोक व्यक्तिगतरित्या, स्वतंत्र्यपणे आपले उद्धिष्ट साध्य करू शकत नाहित हे त्यांना माहित असल्या मुळे त्यांना सहकाराच्या माध्यमातून उद्धिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करावा लागतो. त्यामुळेच इतर संघटन पद्धतीपेक्षा सहकरी संघ्झटन पद्धती स्पर्धात्मक दृष्टया

श्रेष्ठ ठरली आहे.

सहकारी संस्था सभासदाभिमूख असतात. त्या ग्राहकांभिमूख असणे आवश्यक आहे. सहकारी नफा मिळवत असल्या तरी त्या नफेखोर नसतात. या दोहोमध्ये मुलभूत फरक आहे.

### *सहकारी संस्थेंचे संघटन आणि व्यवस्थापन :*

आंतरराष्ट्रीय श्रम संघटणा ही सहकारी संस्थांना संघ आणि उपक्रम असल्याचे मानते. यामुळे सहकारी संस्थेला आपल्या व्यावसायीक व्यवहारांबरोबर नैतीक अधिष्टान ही संभाळावे लागते. सहकारी संस्थेने संभासदांपासून दूर जाने म्हणजे आपल्या ध्येयापासून दूर जाने होय.

सहकारी संस्थांची संघटन प्रणाली, व्यवसायाची शिस्त आणि व्यवस्थापनाची तत्वे याबाबी वेगवेगळया असल्यातरी सहकारी संस्थांनी या तिनही घटनांमध्ये समन्व्यय साधने सहकारी संस्थांच्या व सहकारी चळवळीच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असते.

खाजगी व्यवसाय संस्थांप्रमाणेच सहकारी संस्थांनी आपला व्याप वाढविणे आवश्यक आहे. आपण सहकारी संस्था असून बाजारपेठेच्या स्पर्धेच्या नियमांचा आपल्या बरोबर काही संबंध नाही असे म्हणून जागतिकी करनाच्या मनुष्यातील बाजारपेठ व्यवस्थेतून अम्ग काढून घेता येणार नाही.

### *निष्कर्ष :*

कोणत्याही व्यवसाय संस्थेचे संघटन साचेबंद आणि कायमचे नसते सहकारी संस्थेचेही संघटन तसे नसते.
नविन आर्थिक धोरणांच्या कालवधीत सहकारी संघटनाने आपले स्वत्व सिद्ध करण्याएवजी पिच्छे हाट स्विकारली.
नजिकच्या भविष्यात सहकारी संघटनेला असे नेतृत्व प्राप्त होऊन या चळवळीला भारतीय व्यवस्थेत निर्ययाक भुमिका बजावन्याची सुवर्ण संधी मिळेल अशी आशा करूया.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.www.oldgrt.lbp.world